# भूमि संपादन, पुंर्नवसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम कलम १९ (७) अन्वये अधिसूचना

ज्याअर्थी मौजे पिळोदे, ता. यावल, जि. जळगाव येथील एकुण गट ९७ चे क्षेत्र ४०.०३५ हे.आर .शेळगाव बॅरेज अंतर्गत बुडीत होणारे क्षेत्राचे संपादन करण्यासाठी भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ नुसार कलम १९ ची अधिसुचना क्रमांक भूसंपादन/मौजे पिळोदे/एस.आर- ५०/२०१६ (जुना २४/२००७) यापूर्वी दिनांक २५ आक्टोबर, २०१८ अन्वये अधिसूचना काढली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचना प्रसिध्द झालेपासून १२ महिन्याचे आत म्हणजेच दिनांक २५/१०/२०१९ पावेतो निवाडा प्रसिद्ध होणे आवश्यक होते. तथापि प्रस्तुत भूसंपादन प्रकरणात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जळगाव यांचेकडून फळ झाडे यांचा मुल्यांकन अहवाल दिनांक २७/०५/२०१९ रोजी व वनपरीक्षेत्र अधिकारी, यावल (पूर्व) यांचेकडून वन झाडे यांचा मुल्यांकन दिनांक १७/०६/२०१९ रोजी प्राप्त झालेला आहे. तसेच माहे सप्टेबर २०१९ मध्ये रावेर विधानसभा मतदारसंघ-२०१९ करीता उपविभागीय अधिकारी फैजपूर यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती झालेली असलेने व विधानसभा निवडणूक चे कामात व्यस्त असलेने दिनांक २५/१०/२०१९ पावेतो प्रस्तुत भूसंपादन प्रकरणात निवाडा प्रसिद्ध करता न आल्याबाबत उपविभागीय अधिकारी फैजपूर भाग फैजपूर यांनी दिनांक ३०/११/२०१९ अन्वये मुदतवाढ प्रस्ताव सादर केलेलाआहे.

आणि ज्याअर्थी, भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम १९ (७) नुसार, समुचित शासनाच्या मते, जर कालावधी वाढविण्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तिवात असेल तर, त्याला बारा महिन्याच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल, तसेच कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय, लेखी स्वरुपात नोंदविण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर टाकण्यात येईल, असे नमूद आहे.

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम १९(७) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये क्रमांक भूसंपादन/मौजेपिळोदे/एस.आर- ५०/२०१६ (जुना २४/२००७) या भूसंपादन प्रकरणात भूसंपादनाची कार्यवाही पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी फैजपूर भाग फैजपूर यांना ६ महिन्यांची मुदत वाढ देण्यात आलेली आहे.

जळगाव, २३ जानेवारी, २०२०

COLLECTOR JALGAON
जिल्हाधिकारी जळगाव

(डॉ. अविनाश ढाकणे)
जिल्हाधिकारी, जळगाव
तथा समुचित प्रशासन, जळगाव

Scanned by CamScanner